**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
**नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा व्दारा संचालित,**

# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

## राष्ट्रीय सेवा योजना उद्‌बोधन वर्ग

**दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीनी दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना उद्‌बोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून डॉ. ताराचंद कंठाळे, बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीत डॉ. दीपक कुटे जिल्हा समन्वयक रासेयो, तसेच डॉ. असरार खान आय.क्यू.ए.सी. समन्वयक हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास माहुलकर यांनी भुषविले.

कार्यक्रमाची सुरूवात रासेयोचे आराध्य दैवत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्ज्वलनाने झाली. यावेळी कु. अंजली तायडे या विद्यार्थीनीने स्वागतगीत सादर करून मान्यवरांचे लक्ष आपल्याकडे वेधले.

यानंतर आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये डॉ. ताराचंद कंठाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वरूप विस्तृतपणे विशद केले. आपल्या देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची महत्त्वाची भूमिका असते. देशातील युवाशक्तीला नवचेतना देण्याचे कार्य हे देशातील राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या माध्यमातून होते. तसेच तरूणामध्ये समाजसवेची जाण निर्माण करण्याचे कार्य रासेयोच्या वतीने केले जाते. राष्ट्रीय सेवा योजना हे माणूस घडविणारा कारखाना आहे. अशाप्रकारची अभ्यासपूर्ण मांडणी डॉ. ताराचंद कंठाळे यांनी यावेळी केली. डॉ. दीपक कुटे यांनी युवा शक्तीचेमहत्त्व विशद करून रासेयोच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्याकरिता विद्यार्थ्यांनी एनएसएसमध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्यांनी रासेयोच्या माध्यमातून यासत्रामध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. याकरिता विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम आधिकारी डॉ. नंदकुमार भाकरे यांनी, सूत्रसंचालन कु. प्रतिक्षा तिवारी तर आभार कु. रजनी गायकवाड या विद्यार्थीनीने केले. या कार्यक्रमाकरिता प्रा. डॉ. सुनील ढेरे,डॉ.विकास निंघोट,डॉ.गणेश पवार, डॉ.विजय खोब्रागडे, प्रा.अतुलकुमार सारडे, प्रा. प्रकाश तेलगोटे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुजाता नाईक व रासेयो स्वयंसेवक वैभव इंगोले, पवन निनावे, विक्रम धकाते,शाहरूख शेख, ठाकरे, राठोड, कु.कोमल नेवारे, कु.मंजुशाली तायडे, कु. रक्षा चंद्रकापुरे, कु. शिवानी लव्हाळे यांनी केले.